पुढारी पा. नं. ८

# दफनभूमीला स्थानिकांचा विरोध

## पर्यायी जागा शोधा; पोलिसांची पालिकेला सूचना

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर शहर विकास आराखड्यात पेणकर पाडा येथील आरक्षण क्रमांक ३५३ वरील जागेत मुस्लिम समाजाकरीता दफनभूमी प्रस्तावित करण्यात आली असून त्याला स्थानिक रहिवाशांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. रहिवाशांसह विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्त दिलीप ढोले यांना मंगळवारी निवेदन देऊन दफनभूमीला विरोध केला. यावर काशिमीरा पोलीस ठाण्यात बैठक आयोजित केली असता त्यातही रहिवाशांनी दफनभूमीला तीव्र विरोध दर्शविल्याने शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पर्यायी जागेत दफनभूमी साकारावी, अशी सूचना पोलिसांनी पालिकेला गुरुवारी पत्र पाठवून केली आहे.

पालिकेच्या १९९७ मधील मंजूर विकास आराखड्यात पेणकरपाडा येथील आरक्षण क्रमांक ३५३ वरील ४,९७८.४३ चौरस मीटर जागेत दफनभुमी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याचा विकास पालिकेने गतवर्षी करण्यास सुरुवात केली असता त्याला स्थानिक रहिवाशांनी तीव्र विरोध दर्शविला. याप्रकरणी पालिकेने १७ स्थानिक रहिवाशांवर सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा काशिमीरा पोलीस ठाण्यात दाखल केला आहे. या दफनभूमीला स्थानिकांचा विरोध असल्याने पालिकेने तात्पुरत्या स्वरूपात त्याचे काम थांबविले, तर काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे स्थानिक पदाधिकारी गुलाम फारुकी यांनी शहरातील मुस्लिम लोकसंख्येच्या प्रमाणात दफनभूमीची सुविधा उपलब्ध नसल्याने दफन करण्यात आलेल्या मृतदेहाच्या जागी निश्चित कालावधीपूर्वीच दुसरा मृतदेह दफन करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

### महानगरपालिकेच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष

अगोदरच राज्यात विविध राजकीय, धार्मिक व सांप्रदायिकतेवरून सामाजिक तेढ निर्माण होऊ लागला असताना २२ मार्च ते २२ एप्रिल दरम्यान मुस्लीम धर्मियांच्या रमजान सणाला सुरुवात झाली आहे. त्यातच पेणकर पाडा येथील आरक्षित जागेत दफनभूमीच्या कामाला सुरुवात झाल्यास शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. त्यामुळे यावर पालिका काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

पुढारी पा. नं. ५.

# मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांना जीवे मारण्याची धमकी

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी मनसे ठाणे शहर अध्यक्ष रवींद्र मोरे यांनी नौपाडा पोलिसात तक्रार दाखल केली आहे असून तपास सुरू असल्याचे पोलीसांनी सांगितले.

मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात पक्ष अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यभरातील अनधिकृत मशीद, मजार आणि दर्ग्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी मुंब्रा येथील डोंगरात वनखात्याच्या अखत्यारीत असलेल्या जागेवरील अनधिकृत दर्ग्याचा प्रकार उघडकीस आणला होता. या प्रकरणी जाधव यांनी प्रशासनाला कारवाई करण्याचा इशारा दिला होता. मनसेच्या या इशाऱ्यानंतर जिल्हा प्रशासन आणि वन विभागाने तात्काळ संबंधित ठिकाणची पाहणी करून चौकशी सुरू केली. त्यानंतर मुंब्रात काही धर्मांध लोक याविरोधात एकवटण्यास सुरुवात झाल्याचे मनसेने नौपाडा पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यातील काहींनी अविनाश जाधव यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे, असे देखील तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. हम उसे जिंदा नही छोडेंगे... कोई गुस्ताख छुप न पाएगा... हम उसे ढुंड ढुंड के मारेंगे अशा आशयाचा व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. या व्हायरल व्हिडीओची दखल घेत मनसे ठाणे शहर अध्यक्ष रविंद्र मोरे यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पु-पा-१.

# नालासोपाऱ्यात १० लाखांचे कोकेन जप्त



नालासोपारा : नालासोपाऱ्यात तुळींज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने नालासोपारा पूर्व परिसरातून एका नायजेरियन व्यक्तीला अटक केली आहे. त्याच्याकडून लाखो रुपयांचे कोकेन नावाचे ड्रग्ज सापडले आहे. काही दिवसांपूर्वी नालासोपारा पूर्व प्रगती नगर परिसरात तुळींज पोलिसांनी एका नायजेरियनकडून ५८ लाख ७४ हजार रुपयांच्या अमली पदार्थांचा साठा जप्त केला होता. त्यानंतर नालासोपारा पूर्वेकडील मोरेगाव तालाव येथे तुळींज पोलिसांच्या गुन्ह प्रकटीकरण शाखेनी ५४ वर्षीय नायजेरियन व्यक्तीला कोकेन ड्रग्जसह अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नायजेरियन व्यक्ती कोकेन विकण्यासाठी आला होता, एका गुप्त माहितीच्या आधारावर कारवाई करत पोलिसांनी त्याला पकडले. ओके चिमा गॅम्ब्रिल अंगू असे आरोपीचा नाव आहे, या नायजेरियन आरोपीकडून १० लाख ४० हजार रुपये वजनाचे १०४ ग्रॅम वजनाचे कोकेन जप्त करण्यात आले आहे, आरोपी नायजेरियनविरुद्ध तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नोकरी देण्याच्या नावाखाली फसवणूक

मिरारोड - शांतीनगर, मिरारोड येथे राहणारी महिला ऑनलाईन नोकरी शोधत असताना तिला तिच्या व्हॉटसअॅप वर मेसेज आला त्यावेळी तिची नोकरी देण्याच्या नावाखाली १४३२८६ रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. त्याबाबत नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वप्नाली ही महिला शांतीनगर, मिरारोड येथे राहत असून ती इंटरनेटवर ऑनलाईन काम शोधत असतांना तिला एका टलॅट प्रोकंपनीमधून मेसेज आला. दिलेले टास्क पूर्ण करून तुम्ही घरबसल्या २ ते ३ हजार रुपये कमवू शकता. त्यावेळी त्यांना एक लिंक पाठवण्यात आली. त्या लिंकद्वारे त्यांनी टास्क पूर्ण करून पाठवला असता त्यांना २१० रुपये मिळाले. त्यानंतर त्यांनी संपर्क केला असता दिवसभरात तुम्ही २५ टास्क पूर्ण केले तर २७७७ रुपये मिळतील असे सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी काही टास्क पूर्ण केले व समी नावाच्या महिलेला संपर्क केला. त्यावेळी त्या महिलेने पुढील टास्क पूर्ण करायचे असतील तर तुम्हाला पैसे भरावे लागतील. त्यामधून चांगला नफा मिळेल. त्यानंतर त्यांनी पैसे भरून टास्क पूर्ण केले त्यांना त्यामध्ये नफा मिळाला. त्यांनी १,८०,९६० रुपये भरले त्यातील नफा म्हणून त्यांना ३७,६७४ रुपये परत मिळाले. वेळोवेळी टास्कसाठी पैसे घेवुन ते मला परत न करता त्यांची १,४३,२८६ रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन ग्रुप चालवणाऱ्या समी या महिलेविरोधात नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

लोकमत ५-५-१९.

# ऑनलाइन टॉवेल खरेदीत वृद्धेला लाखांचा गंडा



लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** ऑनलाईन टॉवेल खरेदी करणाऱ्या ७० वर्षीय वृद्धेच्या बँक खात्यातून सायबर लुटारूंनी तब्बल ८ लाख ३० हजार रुपये लांबविले. या प्रकरणी काशीमीरा पोलिसांनी सायबर गुन्हे शाखेच्या तपासानंतर गुन्हा दाखल केला आहे.

मीरा रोडच्या हटकेश भागात राहणाऱ्या चारुबाला खरे (वय ७०) या ऑल इंडिया रेडिओमधून कार्यक्रम अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांनी ऑनलाईन सहा टॉवेल खरेदी करून त्याचे १ हजार १६९ रुपये पे यु वॉलेटवर भरले. मात्र, त्यांच्या बँक खात्यातून १९ हजार ५ रुपये कमी झाल्याने त्यांनी बँकेकडे ऑनलाईन तक्रार केली. तक्रारीनंतर त्यांना अनोळखी व्यक्तीचा कॉल आला. आपण बँकेतून बोलत असल्याचे त्याने सांगितले. गेलेले पैसे परत करण्यासाठी त्या व्यक्तीने ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. तो डाऊनलोड केल्यानंतर त्यांच्या बँक खात्यातून एक लाख रुपये कमी झाल्याचा मेसेज आला. खरे यांनी बँकेत जाऊन खाते व्यवहार बंद करण्यास सांगितले. मात्र, तोपर्यंत सायबर लुटारूंनी थोडे-थोडे करून एकूण ८ लाख ३० हजार रुपये लांबविले. सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार केल्यावर वेगवेगळ्या बँक खात्यातून पैसे हे उत्तरप्रदेशच्या मक्सुडिया अम्बारीमधील दाऊद मसूद नावाच्या बँक खात्यात गेल्याचे समजले. खरे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे.

# कांदळवन नष्ट करून भराव केल्याने गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेला कांदळवन नष्ट करून भराव केल्याप्रकरणी महसूल विभागाने भाईंदर पोलिस ठाण्यात जमीन मालकांसह भराव करणारे ठेकेदार, डंपर - जेसीबीसह त्यांच्या चालक व मालकांवर अखेर आणखी एक गुन्हा दाखल केला आहे. पोलिस, पालिका, महसूलने वेळीच कारवाई न केल्याने चक्क मातीचा रस्ता बनविला आहे.

भाईंदर पश्चिमेच्या एका निवासी संकुलाच्या मागील कांदळवन जमीनमालक आणि भरणी माफियांनी प्रशासनाच्या संगनमताने सातत्याने नष्ट करून भराव केल्याबाबच्या तक्रारी सामाजिक संस्थेचे कृष्ण गुप्ता यांनी गेल्यावर्षी सप्टेंबरपासून केल्या होत्या. या भागात पूर्वीसुद्धा गुन्हे दाखल असून, कोकण आयुक्तांच्या निर्देशानुसार विभागीय कांदळवन समितीने २०१९ मध्ये तर त्या आधी व नंतरसुद्धा अनेकवेळा स्थळपाहणी होऊन अहवाल सादर केले होते.

गुप्ता यांनी भरणी माफियांसह वाहनांची छायाचित्रे पोलिसांना देऊनसुद्धा पोलिस भराव करण्यास मोकळीक देत असल्याचे आरोप झाले. कांदळवन समितीने पुन्हा पाहणी केली. याशिवाय वन विभागाने अहवाल दिल्यानंतरही गुन्हा दाखल करण्यासाठी सर्व्हेअरने मोजणी न केल्याने विलंब झाला.

नायब तहसीलदार स्मिता गुरव यांच्या तक्रारीवरून सर्व्हे क्रमांक २००, २०१ व २०२ मधील काही हिस्सेधारकांसह डंपर - जेसीबीचे चालक व मालकांवर पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मीरा - भाईंदरमध्ये कोविडचे ९ ॲक्टिव्ह रुग्ण

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा - भाईंदरमध्ये साथरोग नाही. कोविड आणि एन्फ्लूएन्झा अर्थात 'एच ३ एन २'चे सुद्धा नाममात्र रुग्ण आहेत. शहरात कोविडचे शनिवारपर्यंत ९ ॲक्टिव्ह रुग्ण होते. त्यातील ८ रुग्ण घरीच अलगीकरणामध्ये तर एक मुंबईच्या रुग्णालयात आहे. 'एच ३ एन २'च्या ४ रुग्णांपैकी ३ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. तर एका वृद्धावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पालिकेची शहरात १० आरोग्य केंद्र, १ दवाखाना व १ रुग्णालय असून, त्या अंतर्गत सुमारे २०० कर्मचारी घरोघरी जाऊन शासनाच्या सूचनांप्रमाणे जनजागृती व सर्वेक्षण करत आहेत. या सर्वेक्षणात कोविड व 'एच ३ एन २'ची लक्षणे दिसल्यास तत्काळ चाचण्या, उपचार व अलगीकरण आदी स्वरूपाची कार्यवाही केली जात आहे. पालिकेनेही व्यापक जनजागृती करण्यासह निर्देशांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईसाठी विशेष पथके सक्रिय करणे आवश्यक आहे.

## कोविड रुग्णांसाठी स्वतंत्र १०० खाटा

- महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय विभागाने टास्क फोर्सच्या बैठका सुरू केल्या आहेत.
- त्यात कोविड, 'एच ३ एन २'चा आढावा घेतला जात आहे. कर्मचारी घरोघरी तपासणी, जनजागृती करत आहेत. लसीकरणही सुरू आहे.
- शहरातील सर्व खासगी डॉक्टर व रुग्णालयांना अशा स्वरूपाचे रुग्ण आल्यास तत्काळ उपचार करण्याचे निर्देश दिले आहेत.
- भाईंदरच्या भीमसेन जोशी सरकारी रुग्णालयात कोविड रुग्णांसाठी स्वतंत्र १०० खाटा ठेवण्यात आल्या आहेत.

Scanned with CamScanner

सकाळ पा. नं. २.

# काँग्रेसचे ठिकठिकाणी आंदोलन

## राहुल गांधी यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द केल्याचा निषेध

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई/छत्रपती संभाजीनगर, ता. २६ : काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्याच्या विरोधात काँग्रेस पक्षातर्फे आज राज्यात मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नाशिकसह अनेक शहरांत धरणे आंदोलन करण्यात आले. संभाजीनगरमध्ये शहागंज येथील महात्मा गांधी पुतळ्यासमोर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी 'सत्याग्रह डरो मत, संविधान अभी जिंदा है' असे फलक कार्यकर्त्यांनी झळकाविले होते.

आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष डॉ. कल्याण काळे, शहराध्यक्ष शेख युसूफ यांनी केले. याप्रसंगी विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे आदी उपस्थित होते. दानवे म्हणाले की, जे कुणी मोदी सरकारच्या विरोधात बोलेल त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. यावेळी कम्युनिस्ट पक्षाचे अभय टाकसाळ, प्रा.एम. एम. देसरडा, कामगार नेते सुभाष लोमटे यांनी या सत्याग्रहाला पाठिंबा दिला.

नाशिकरोड ब्लॉक काँग्रेस कमिटीतर्फे देवळाली गाव येथील महात्मा गांधी पुतळ्यासमोर मूक धरणे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. लोकशाही व्यवस्थेची हत्या करण्याचे षडयंत्र केंद्रातील मोदी सरकार करीत आहे, असा आरोप करत दडपशाहीच्या निषेधार्थ महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मूक सत्याग्रह केला. राहुल गांधी यांच्यावर सुडापोटी कारवाई केल्याचा आरोप करून निषेध व्यक्त करण्यात आला.

पुण्यनगरी पु. पा. ४.

# भाईंदरमध्ये काँग्रेसचे सत्याग्रह आंदोलन



**। मीरा रोड :** भाईंदर पूर्वेला राहुल गांधी यांचे लोकसभेचे सदस्यत्व रद्द केल्याच्या निषेधार्थ काँग्रेसकडून सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. या आंदोलनावेळी लोकशाहीची मूल्यं पायदळी तुडवत बहुमताच्या जोरावर मोदी सरकारने उद्योगपतींना खुश करण्यासाठी हुकूमशाही सुरू केल्याने देशाची लोकशाही धोक्यात आल्याचा आरोप काँग्रेसचे माजी आमदार मुझफ्फर हुसैन यांनी केला. राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांचे लोकसभेचे सदस्यत्व रद्द केल्याच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाने देशभर सत्याग्रह आंदोलन सुरू केले आहे.

मीरा भाईंदर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने नवघर नाका भाईंदर पूर्व येथे आयोजित कार्यक्रमात हुसैन बोलत होते. ते पुढे म्हणाले की ज्यांनी देशाला लुटले, लाखो कोटी रुपयांचा घोटाळा करून देशाबाहेर पळून गेले, अशा चोरांना चोर म्हणणे देशात गुन्हा ठरतो. अदानी व मोदी यांचे नाते काय? वीस हजार कोटी कोणाचे? लोकशाही मार्गाने लोकसभा अधिवेशनात प्रश्न विचारले तर मोदींना राग येतो, म्हणूनच बहुमताच्या जोरावर निलंबन करण्याचे निर्णय घेतले जात आहेत. लोकशाहीचे चारही स्तंभ खिळखिळे केले असून, गेल्या आठ वर्षांत देशात मनमानी कारभार सुरू आहे. महागाई, बेरोजगारी वाढली आहे, त्याबद्दल काहीही न करता फक्त दोन उद्योगपतींच्या इशाऱ्यावर देश चालवला जात असून, विरोधी पक्षांचा आवाज दाबला जात आहे. जो प्रश्न उपस्थित करतो, त्याची चौकशी लावली जाते. ईडी, इन्कम टॅक्स, सीबीआय, निवडणूक आयोगसारख्या संविधानिक संस्थांवर नियंत्रण ठेवत विरोधी पक्षांना टार्गेट केले जात असल्याने आगामी निवडणुकीत जागा दाखवण्यासाठी जनतेनेच उठाव करावा, असे आवाहन हुसैन यांनी केले. यावेळी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नगरसेवक प्रवीण पाटील, नीलम धवन, राष्ट्रवादी काँग्रेसचे आसिफ शेख, काँग्रेसचे सर्व नगरसेवक, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी एक दिवसीय सत्याग्रह आंदोलनात सहभाग घेतला.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी ५.५.७

# कर्ज घेण्यासाठी कागदपत्रे देताय सावधान!

## बँकेतून कर्ज घेऊन फसवणूक, दोघांना अटक



**। नालासोपारा :** बनावट कागदपत्राद्वारे विविध बँकांतून कर्जावर वाहने खरेदी करून फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात युनिट ३ च्या गुन्हे शाखेला यश आले. संजय बाळा परब (४४) आणि मोहम्मद मुस्ताक युसूफ बोहरा (५०) अशी दोघांची नावे आहेत. त्यांच्याकडून नऊ वाहने जप्त केली आहेत.

वसई तालुक्यात २१ डिसेंबर ते ११ फेब्रुवारी २०२३ दरम्यान बाबासाहेब लिंबराज ओव्हाळ (३९) यांचे आरोपीने बनावट पॅनकार्ड, आधारकार्ड बनवून त्यांच्या नावे मुथूट फिनकॉर्प, एस. आय. क्रेवा कॅपिटल, आयडीएफसी फर्स्ट बँक, कोटक प्राईम फायनान्स, एलएनटी फायनान्स आणि मास फायनान्स या विविध फायनान्स कंपन्यांमधून ५ लाख २१ हजार ५८३ रुपयांचे कर्ज काढून फसवणूक केली. विरार पोलिसांनी विविध कलमांन्वये ११ फेब्रुवारीला गुन्हा दाखल केला होता. या फसवणुकीच्या गुन्ह्यांची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेतली होती. दाखल गुन्ह्यांचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट तीनने सुरू केला.

पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत, शिवाजी खाडे, पोलीस हवालदार अशोक पाटील, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज़ सकपाळ, अश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव, प्रवीण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव, संतोष चव्हाण यांनी सापळा रचून आरोपी संजय बाळा परब (४४) आणि मोहम्मद मुस्ताक युसूफ बोहरा (५०) या दोघांना ताब्यात घेतले. अधिक तपास केल्यावर आरोपींनी त्यांचे इतर साथीदारासोबत आपसात संगनमत करून हे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी अटक आरोपींचा अधिक तपास केला असता त्यांनी वेगवेगळ्या इसमांच्या नावे बनावट कागदपत्रे बनवून विविध फायनान्स कंपन्यांमधून एकूण ६ लाख ३० हजार रुपये किंमतीच्या विविध कंपनीच्या ९ दुचाकी खरेदी केल्याचे उघड झाले. पोलिसांनी या सर्व दुचाकी ताब्यात घेतल्या आहेत.

सकाळ ५.५.३.

# मिरा रोडमध्ये कायमस्वरूपी तिरंगा स्थापन करा : सावंत

भाईंदर, ता. २६ (बातमीदार) : मिरा रोड पूर्व रेल्वे स्थानकाबाहेर कायमस्वरूपी तिरंग्याची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात काँग्रेसचे माजी वरिष्ठ नगरसेवक अनिल सावंत यांनी आयुक्त दिलीप ढोले यांना पत्र दिले.

मिरा रोड रेल्वे स्थानकाबाहेर अतिशय आकर्षक अशी कमान उभारली असून परिसराचे सुशोभीकरण केले आहे. काश्मीरमध्ये अतिरेक्यांशी लढताना हौतात्म्य पत्करलेले मेजर कौस्तुभ राणे स्मृतिस्तंभदेखील याच परिसरात उभारण्यात आला आहे. त्यामुळे हे ठिकाणी तिरंग्याची स्थापना करण्यासाठी योग्य असून येथे चोवीस तास डौलाने फडकत राहील, असा तिरंगा स्थापन करावा. अशा पद्धतीने चोवीस तास फडकत राहणारा तिरंगा अन्य शहरात स्थापन करण्यात आला आहे. त्याच पद्धतीने महापालिकेने यासाठी पुढाकार घ्यावा, असे सावंत यांनी पत्रात नमूद केले.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पा. नं. ३.


# राज्यात कोरोना रुग्णांचा आलेख तिपटीने वाढला!

## मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात रुग्णांचा आकडा अडीच हजारावर

**। मुंबई :** कोरोना रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहे. याचा पत्यय प्रत्येक मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात आला आहे. पहिल्या दोन आठवड्यांच्या तुलनेत ही संख्या तिपटीने वाढली आहे. रुग्णसंख्येने २५००चा आकडा ओलांडला आहे. रुग्णसंख्येत वाढ होत असल्याचे केंद्राच्या आरोग्य विभागाकडून जाहीर करण्यात आल्याने राज्यात विविध उपाययोजना राबवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. तरीही रुग्णसंख्या वाढत असल्याने आरोग्य यंत्रणा काय पावले उचलणार, याकडे लक्ष लागले आहे.

मार्चच्या प्रारंभापासून रुग्णसंख्येत वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. मार्चच्या पहिल्या आठवड्यात राज्यात ३५५ रुग्ण सापडले, तर दुसऱ्या आठवड्यात यात दुपटीने वाढ होत १५ मार्चपर्यंत ७५४ रुग्ण सापडले होते. यामुळे केंद्रीय आरोग्य विभागाकडून राज्याला सतर्क राहण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर राज्य सरकारने तातडीने उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. मात्र, त्यानंतर रुग्णसंख्येत वाढच झाली आहे. १६ ते २५ मार्चदरम्यान राज्यात तब्बल २,६४८ रुग्ण सापडले आहेत. ही वाढ मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात रुग्णसंख्येच्या तुलनेत तिपटीने अधिक आहे. या कालावधीत प्रत्येक दिवशीची रुग्णसंख्या ही २०० पेक्षा अधिक आहे. २२ व २४ मार्च रोजी रुग्णसंख्येने ३००चा टप्पा ओलांडला आहे. २५ मार्चला ४०० टप्पा ओलांडला आहे. यामुळे राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णांच्या संख्येत वाढ होऊन ती १,९५६ इतकी झाली आहे.

| | रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|
| १६ मार्च | २४६ | |
| १७ मार्च | १९७ | १ |
| १८ मार्च | २४९ | १ |
| १९ मार्च | २३६ | |
| २० मार्च | १२८ | |
| २१ मार्च | २८० | १ |
| २२ मार्च | ३३४ | १ |
| २३ मार्च | १९८ | |
| २४ मार्च | ३४३ | ३ |
| २५ मार्च | ४३७ | २ |
| एकूण | २,६४८ | |



मार्चच्या पहिल्या १५ दिवसांमध्ये चार जणांचा मृत्यू झाला होता. मात्र, त्यानंतर १६ ते २५ मार्च या १० दिवसांच्या कालावधीत मार्चमध्ये ९ जणांचा मृत्यू झाला आहे. १७, १८, २१ आणि २२ मार्चला अनुक्रमे एका रुग्णाचा २४ मार्चला तीन तर २५ मार्चला २ रुग्णांचा मृत्यू झाला.

" कोरोना विषाणूत सातत्याने बदल होत आहे. सध्याच्या वाढीसाठी नवा व्हेरिएंट कारणीभूत असण्याची शक्यता आहे. सध्य कोणाला व्हेंटिलेटरची गरज लागत नसून, मृत्यूही होत नाहीत. सर्दी, खोकला झालेल्यांनी तसेच दीर्घ आजार असलेले नागरिक, ज्येष्ठ नागरिक, फुफ्फुस व श्वसनाचे आजार असलेल्या नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. त्याचा परिणाम रुग्णसंख्या वाढीवर दिसून येण्याची शक्यता आहे. मात्र, फ्रंटलाईन वर्कर्सनी लस घेणे गरजेचे आहे.

– डॉ. अविनाश सुपे, अध्यक्ष, मृत्यू विश्लेषण समिती, राज्य टास्क फोर्स.

# बनावट टी-शर्ट विक्रीबाबत गुन्हा

नालासोपारा : ब्रॅन्डेड कंपनीच्या नावाचा वापर करत बनावट कपडे विक्रीसाठी ठेवल्याप्रकरणी वसईत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोखिवरे गाव येथील क्रिसेंट इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये रॉक अँड टॉप या कंपनीत आरोपी सुनीलभाई मधुभाई गोहिल (४५) यांनी शुक्रवारी संध्याकाळी चारच्या सुमारास गुरगाव येथील पुमा कंपनीच्या नावाने रजिस्टर असलेले ७० हजार रुपये किमतीचे बनावट टी-शर्ट बनवून ते विक्रीकरिता साठा करून ठेवलेले आढळून आले होते. कंपनीच्या कॉपीराईट हक्काचे उल्लंघन केल्याप्रकरणी शनिवारी वालीव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Mar 27, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# नालासोपाऱ्यात गांजा जप्त

नालासोपारा : नालासोपारा येथे गांजा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. पोस्ट ऑफिस नाका येथे आरोपी अल्बर्ट ऊर्फ धर्मेश राजू ब्राह्मनिया (३५) याच्या ताब्यात शनिवारी दुपारी तीनच्या सुमारास पोलिसांना प्लास्टिकच्या पिशवीत १० हजार रुपये किमतीचा गांजा हा अमली पदार्थ आढळून आला होता. शनिवारी तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Mar 27, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# फर्जी दस्तावेजों से लेते थे लोन, 2 ठग हुए गिरफ्तार

**निसं, नालासोपाराः** क्राइम ब्रांच यूनिट-3 ने एक ऐसे गिरोह का पर्दाफाश किया है, जो फर्जी दस्तावेज बनाकर अलग-अलग बैंकों से लोन लेकर धोखाधड़ी करता था। बैंकों से लोन लेकर यह गिरोह वाहन खरीदता था। क्राइम ब्रांच ने आरोपियों के पास से साढ़े छह लाख रुपये कीमत के नौ वाहन बरामद किए हैं।

नालासोपारा

**बैंकों ने पड़ताल नहीं की :** क्राइम ब्रांच यूनिट 3 के पुलिस निरीक्षक प्रमोद बड़ाख ने बताया कि विरार निवासी बाला साहेब लिंबराज ओव्हाल (39) ने एक महीने पहले विरार पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज कराई थी। उसने बताया कि उसके नाम का फर्जी आधार कार्ड और पैन कार्ड बनाकर किसी ठग ने मुथूट फिनकॉर्प, एसआई क्रेवा कैपिटल, आईडीएफसी फर्स्ट बैंक, कोटक प्राईम फाइनैंस, एलएनटी फाइनैंस और मास फाइनैंस से 5 लाख 21 हजार रुपये का लोन लिया है। बैंकों ने इन कागजातों की जांच पड़ताल किए ही लोन दे दिया। किश्त न भरने पर बैंकों ने उसके खिलाफ विरार पुलिस स्टेशन में धोखाधड़ी का मामला दर्ज कराया है।

**विरार से दो आरोपी पकड़े गएः** क्राइम ब्रांच यूनिट टीम की टीम ने मामले को गंभीरता से लेते हुए दो संदिग्ध आरोपियों संजय बाला परब और मोहम्मद मुस्ताक यूसुफ बोहरा को विरार से गिरफ्तार किया है।

Scanned with CamScanner